सकाळ

# ‘रवळनाथ’चा एक हजार कोटी व्यवसायाचा टप्पा : चौगुले

■ सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. ३ : येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीने ३० जूनअखेर ऐतिहासिक कामगिरी नोंदवत ६०० कोटींच्या ठेवी व ४०६ कोटींचे कर्ज वितरणसह एकत्रित व्यवसायाचा एक हजार कोटींचा टप्पा पूर्ण केला. एकूण व्यवसाय एक हजार सहा कोटींचा झाला आहे. संस्थेच्याप्रती कर्मचाऱ्यांचा व्यवसायही सव्वासहा कोटींवर पोहोचला आहे, अशी माहिती संस्थापक-अध्यक्ष तथा संचालक एम. एल. चौगुले व रवळनाथचे अध्यक्ष डॉ. आर. एस. निळपणकर यांनी दिली.





एम. एल. चौगुले, निळपणकर

निळपणकर म्हणाले, ‘महाराष्ट्र व कर्नाटकमधील १६ शाखांच्या माध्यमातून संस्थेने सुरक्षित ठेवी, जलद कर्जवाटप, पारदर्शक व्यवहार व ग्राहकाभिमुख सेवामुळे अल्पावधीतच प्रगती साधली आहे. संस्थेच्या सर्व शाखांमधून एनईएफटी, आरटीजीएस, मोबाईल बँकिंग, डिजिटल बँकिंग सुविधा व वयोवृद्ध व गंभीर आजारी ग्राहकांना घरपोच सेवा दिली जाते.’ उपाध्यक्ष डॉ. संजय चौगुले यांच्यासह संचालक, सीईओ डी. के. मायदेव आदी उपस्थित होते.

Kolhapur, Kopjillha
04/07/2026 Page No. 2